# वसई-विरार शहर महानगरपालिका
## वैद्यकीय आरोग्य विभाग

दि.०६/१०/२०२२

**प्रेसनोट**

मा.आयुक्त, आरोग्य सेवा तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे क्रमांक – राकुकका/माता आरोग्य/ मार्ग सूचना/११९६३५-९००/२२ , दिनांक २०/०९/२०२२ च्या अन्वयेच्या **“माता सुरक्षित तर घर सुरक्षित” अभियाना**च्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यातील **१८ वर्षावरील महिला, माता, गरोदर स्त्रिया** यांच्या सर्वांगीण **आरोग्य तपासणीसाठी** दिनांक २६/०९/२०२२ पासून “माता सुरक्षित तर घर सुरक्षित” हे अभियान राज्यभर तसेच वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात राबविण्यात येत आहे.

**“माता सुरक्षित तर घर सुरक्षित”** अभियाना अंतर्गत दि.२६/०९/२०२२ ते ०५/१०/२०२२ पर्यंत वसई विरार शहर महानगरपालिकेच्या २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, ५ रुग्णालये व ३ माता बाल संगोपन केंद्र यांचे मार्फत १८ वर्षावरील एकूण **१,४१,४५३** महिलांची आरोग्य तपासणी करण्यात आली. आरोग्य तपासणी केल्यानंतर एकूण १९० गरोदर महिलांना Iron Sucrose, ५०४५ महिलांना फोलिक ॲसिड च्या गोळ्या, २७८० महिलांना IFA गोळ्या, ४८७९ महिलांना कॅल्शियम च्या गोळ्या मोफत देण्यात आल्या. त्याचप्रमाणे महानगरपालिका रुग्णालयांमार्फत स्तनपान आणि स्तन आरोग्य तपासणी, गरोदरपणातील आरोग्यदायी आहार, लसीकरणाचे वेळापत्रक, प्रसूतीपूर्व व प्रसूतीनंतर घ्यावयाची काळजी याविषयी चर्चासत्र आयोजित करून माहिती देण्यात आली. ७० महिलांना त्वचारोग विषयी तपासणी करून औषधे देण्यात आली व ७८ महिलांची शस्त्रक्रिया बाह्यरुग्ण विभागात तपासणी करण्यात आली, तसेच १८ महिलांची मॅमोग्राफी करण्यात आली.

**वैद्यकीय आरोग्य विभाग**
**वसई विरार शहर महानगरपालिका**